कमलाकर सावंत व.२ वि.

सुर्यकांत सावंत व.७

## निशाणी क्र.८० वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्याविरूध्द झालेला 'युक्तीवाद नाही' असा आदेश रद्द होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र.१ यांचे मते, प्रस्तुतचा दावा हा मागील तारखेस निशाणी क्र.६ वरील कोर्ट कमिशन अर्जावर युक्तीवादाकरीता नेमण्यात आलेला होता. परंतु, प्रतिवादीतर्फे मागील तारखेस युक्तीवाद झाला नाही म्हणून मे. न्यायालयाने दि.०५.०१.२०२६ रोजी निशाणी क्र.६ वर प्रतिवादीतर्फे युक्तीवाद नाही, असा आदेश पारीत केला आहे. परंतु, याकामी प्रतिवादीतर्फे युक्तीवाद होणे आवश्यक आहे. कारण मे.दिवाणी न्यायालय वर्ग-१, क्रमांक १ न्यायालयात चालू असलेला रे.दि.मु.नं.१३३/२०२१ तसेच रे.दि.मु.नं.४१/२०२० मध्ये वादी पक्षकार आहेत आणि त्यांचे खरेदीखत बेकायदेशीर आहे, त्याबाबत वाद सुरु आहे. तसेच वादी यांचे नाव सातबारा सदरातून कमी व्हावे म्हणून आर.टी.एस. अपिल दाखल करण्यात आले होते, ते मंजूर झालेले आहे व वादीचे नाव सातबारासदरातून कमी करण्यासाठी आदेश झाला त्या दाव्यातील मिळकत किंवा नकाशा या दाव्यातील मिळकत किंवा नकाशा या वस्तूस्थिती मे. न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. त्याकरीता प्रतिवादीतर्फे युक्तीवाद होणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे त्यांचेविरूध्द पारीत झालेला 'युक्तीवाद नाही' असा आदेश रद्द होवून युक्तीवाद सादर करणेस परवानगी मिळावी, अशी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर वादी यांनी म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप घेतला आहे. त्यांचे असे कथन आहे की, अर्जात नमुद केलेले कारण हे पुरेसे नाही. प्रतिवादी यांनी अनावश्यकपणे इतर दाव्यांचा संदर्भ प्रस्तुत अर्जात दिलेला आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी दाव्याची सुनावणी लांबणीवर

टाकण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे वादींनी अर्ज नामंजूर करणेची विनंती केलेली आहे.

**४.** अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे व रोजनाम्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ यांचेविरुध्द दि.०५/०१/२०२६ रोजी 'युक्तीवाद नाही' असा आदेश पारीत झालेला आहे. त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी दिनांक ०४/०३/२०२६ रोजी दाखल करुन युक्तीवाद सादर करणेची परवानगी मागितली आहे. प्रस्तुत अर्जावर वादी यांनी आपले म्हणणे दाखल करुन अर्जात नमुद कारण पुरेसे नाही, असे कथन केलेले आहे. प्रतिवादी क्र.१ यांना त्यांचा युक्तीवाद मांडणेची संधी दिलेस वादी यांचे नुकसान होणार नाही. याउलट अर्जाचा गुणदोषावर निर्णय होणेस मदत होणार आहे. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**-:: आदेश ::-**

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु.१००/- (रु.शंभर मात्र) खर्चाने मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ यांनी खर्चाची रक्कम वादीला पुढील तारखेस वा तत्पूर्वी देणेची आहे.

३. प्रतिवादी क्र.१ यांचेविरूध्द पारीत झालेला 'युक्तीवाद नाही' आदेश खर्चाची रक्कम भरलेनंतर रद्द करण्यात येतो.

४. प्रतिवादी क्र.१ यांनी निशाणी क्र.६ वर आपला युक्तीवाद पुढील तारखेस सादर करणेचा आहे.

५. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर )

सही/-

दिनांक:- ०६/०५/२०२६ ( एन.ए.बकरे )

ठिकाण:- कुडाळ सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ